पाकिस्तान आणि अफगाणिस्तान विषयक भारत-रशिया विशेष यंत्रणेची 7वी बैठक (14 ऑक्टोबर, 2026)

'पाकिस्तान आणि अफगाणिस्तान विषयक भारत-रशिया विशेष यंत्रणे' अंतर्गत चर्चेची 7वी फेरी 14 ऑक्टोबर 2026 रोजी नवी दिल्ली येथे पार पडली. या बैठकीचे सह-अध्यक्षपद भारताचे उपराष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री पवन कपूर आणि रशियाच्या सुरक्षा परिषदेचे उपसचिव श्री अलेक्झांडर व्हेनेडिक्टोव्ह यांनी भूषवले.

2. आंतरराष्ट्रीय सुरक्षेवर होणाऱ्या परिणामांसह सामायिक हिताच्या विविध मुद्द्यांवर दोन्ही बाजूंनी व्यापक चर्चा केली. 'भारत-रशिया विशेष आणि विशेषाधिकारप्राप्त धोरणात्मक भागीदारी'च्या चौकटीत आपले विद्यमान सहकार्य अधिक मजबूत करण्याच्या वचनबद्धतेचा उभय पक्षांनी पुनरुच्चार केला.

3. आपल्या या भेटीदरम्यान श्री व्हेनेडिक्टोव्ह यांनी राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार श्री अजित डोवाल यांचीही सदिच्छा भेट घेतली.

नवी दिल्ली

14 ऑक्टोबर 2026